# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 14/09/2023 (गुरूवार) सकाळ


### नागपूर ग्रामीण पोलीस अधीक्षक यांनी केली किल्ले कोलार तसेच नांदा फाटा येथील गणेश विसर्जन स्थळाची पाहणी

नागपूर ग्रामीण हद्दीतील पोलीस स्टेशन खापरखेडा अंतर्गत येणाऱ्या किल्ले कोलार येथे सुमारे ११ हजार खाजगी गणपतींचे विसर्जन यावेळी होणार असुन तसेच नांदा फाटा कोराडी येथील कृत्रिम तलाव येथे जवळपास १५०० सार्वजनिक गणपतीचे विसर्जन होण्याची शक्यता आहे. नागपूर शहर आणि ग्रामीण येथील सार्वजनिक व खाजगी गणपतीचे या दोन्ही ठिकाणी विसर्जन होणार आहे. दिनांक १३/०९/२०२३ रोजी नागपूर ग्रामीण पोलीस अधीक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार (भा. पो. से.) यांनी दोन्ही विसर्जस्थळाची पाहणी करून तसेच चोख बंदोबस्त लावण्यासंबंधी आढावा घेतला. कोलार नदी किल्ले कोलार विसर्जनस्थळ येथील पाहणी करून बंदोबस्त संबंधाने नियोजन आखण्यात आले.





पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर